# जळगांव जिल्हा होमगार्ड नोंदणी - 2024

**माहितीपत्रक -**

## होमगार्ड संघटना -

**उद्देश :** देशातील जास्तीजास्त नागरीकांना सैनिकी, तसेच आपतकालीन मदतकार्याचे, कायदा व सुव्यवस्था सुरळीत राखण्याचे प्रशिक्षण देवून जबाबदार व शिस्तप्रिय नागरीक घडविणे हा होमगार्ड संघटनेचा उद्देश आहे.

**होमगार्ड सदस्य नोंदणीकरीता उमेदवारांसाठी मर्गदर्शक सूचना :**

1. **होमगार्ड सदस्यत्व :** महाराष्ट्रातील होमगार्ड संघटना ही शासन संचलित पुर्णत: मानसेवी तत्वावर आधारित आहे. या संघटनेचे सदस्य होणे म्हणजे कोणत्याही प्रकारची नोकरी अथवा रोजगार हमी नाही. हे सदस्यत्व तीन वर्षाकरीता दिले जात असून आपण संघटनेसाठी दिलेल्या सेवेच्या गुणवत्तेवर पुढे 3-3 वर्षाच्या टप्प्याने वयाच्या 58 वर्षापर्यंत पुर्णनोंदणीकृत करता येते.
2. **होमगार्ड सदस्यांचे कर्तव्य :** होमगार्ड सदस्यांना दररोज कर्तव्य दिले जात नाही.
   पोलीस दलाच्या मागणी प्रमाणे कायदा व सुव्यवस्था राखणे कामी पोलीस दलासोबत बंदोबस्त् कर्तव्य, आपतकालीन परिस्थितीमध्ये अग्निशमन, विमोचन, पूरविमोचन तसेच रोगराई / महामारीकाळात, संपकाळात प्रशासनांस मदतकार्य अशी कर्तव्ये दिली जातात.
3. **होमगार्ड ना देय भत्ते :** होमगार्ड सदस्यांना बंदोबस्त काळात प्रतिदिन रु. 570/- कर्तव्य भत्ता व रु. 100/- उपहारभत्ता दिला जातो. तसेच प्रशिक्षण काळात रु. 35/- खिसाभत्ता व रु. 100/- भोजनभत्ता व साप्ताहिक कवायतीसाठी रु. 90/- कवायत भत्ता दिला जातो.
4. **शास्ती :** होमगार्ड सदस्यांना दररोज कर्तव्य दिले जात नाही परंतू अत्यावश्यक प्रसंगी बंदोबस्त कर्तव्याकरीता विनाकारण अनुपस्थित राहणाऱ्या/कर्तव्यामध्ये कसून करणाऱ्या/आदेशांचे पालन न करणाऱ्या होमगार्ड सदस्यांवर मुंबई होमगार्ड अधिनियम 1947 कलम 7(1) अन्वये बडतर्फ किंवा रु. 250/- इतका दंड/तीन महिन्याची साधी कैद अशी शिक्षा करण्याची तरतूद आहे.
5. **होमगार्ड नोंदणी :** होमगार्ड नोंदणी करीता कोणत्याही प्रकारचे शुल्क् आकारले जात नाही. सदस्यत्वा करीता कोणत्याही इतर मार्गाचा (वशिला किंवा लाच) अवलंब करु नये या करीता कोणीही लाच/पैशाची मागणी केल्यास अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, जळगांव किंवा मा. जिल्हा समादेशक तथा अपर पोलिस अधिक्षक जळगांव यांचेशी संपर्क साधावा.
6. **होमगार्ड सदस्यत्वाचे फायदे :**
   1. सैनिकी गणवेश परीधान करणेचा मान व विनाशुल्क् सैनिकी प्रशिक्षण.
   2. 3 वर्षे सेवापुर्ण होमगार्डना राज्य् पोलिस दल, वनविभाग, अग्निशमन दलामध्ये 5% आरक्षण.
   3. प्रथमोपचार, अग्निशमन, विमोचन या सारख्या विषयांचे प्रशिक्षण घेण्याची संधी.
   4. गौरवास्प्द कामगिरी केल्यास विवीध पुरस्कार/पदके मिळविण्याची संधी.
   5. स्व्त:चा व्यवसाय/शेती इ. सांभाळत देशसेवा करण्याची संधी.

# जळगांव जिल्हा होमगार्ड नोंदणी - 2024

## होमगार्ड नोंदणी नियम व अटी (होमगार्ड सदस्य् नोंदणीसाठी पात्रतेचे निकष)

1) शैक्षणिक अर्हता कमीत कमी इयत्ता 10 वी उत्तीर्ण (SSC) असावा.

2) शारिरीक पात्राता - (दि. 31/07/2024 रोजी)

**वय** - 20 ते 50 वर्षे होमगार्ड नोंदणीसाठी (दि. 31/07/1974 नंतर ते दि. 31/07/2004 पुर्वी)

**उंची -** पुरुष उमेदवारासाठी उंची 162 से.मी. व महिला उमेदवारासाठी 150 से.मी.

**छाती - (फक्त् पुरुष उमेदवारांकरीता)**(न फुगविता किमा.76 से.मी. कमीत कमी 5 सेमी फुगविणे आवश्यक)

अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या पुढील चाचण्या घेतल्या जाणार नाही.

**3) आवश्यक कागदपत्र -**

1- रहीवासाचा पुरावा - मतदान ओळखपत्र, आधारकार्ड.

2- शैक्षणिक अहर्ता प्रमाणपत्र.

3- जन्म् दिनांक पुराव्याकरीता SSC बोर्ड प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला.

4- तांत्रिक अहर्ता धारण करीत असल्यास तत्सम् प्रमाणपत्र.

5- खाजगी नोकरी करीत असल्यास मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्र.

6- 3 महिन्याचे आतील पोलीस चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र.

**2. शारिरीक क्षमता चाचणी.**

*उमेदवारांना धावणे शारिरीक चाचणीमध्ये किमान 10 गुण मिळवून पात्र होणे आवश्यक असुन धावणे चाचणीमध्ये अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या पुढील चाचण्या घेतल्या जाणार नाही.

अ) धावणे गुण द्यावयाची पध्दती

| पुरुष उमेदवार | | महिला उमेदवार | |
|---|---|---|---|
| 1600 मीटर धावणे (परिशिष्ठ - 4 अ) | गुण 20 | 800 मीटर धावणे (परिशिष्ठ - 4 ब) | गुण 25 |
| 5 मि. 10 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | 20 गुण | 2 मि. 50 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | 25 गुण |
| 5 मि. 10 सेकंदापेक्षा जास्त् परंतु 5 मि. 30 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | 18 गुण | 2 मि. 50 सेकंदापेक्षा जास्त परंतु 3 मि. 00 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | 22 गुण |
| 5 मि. 30 सेकंदापेक्षा जास्त् परंतु 5 मि. 50 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | 16 गुण | 3 मि. 00 सेकंदापेक्षा जास्त परंतु 3 मि. 10 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | 18 गुण |
| 5 मि. 50 सेकंदापेक्षा जास्त् परंतु 6 मि. 10 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | 14 गुण | 3 मि. 10 सेकंदापेक्षा जास्त परंतु 3 मि. 20 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | 14 गुण |
| 6 मि. 10 सेकंदापेक्षा जास्त् परंतु 6 मि. 30 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | 12 गुण | 3 मि. 20 सेकंदापेक्षा जास्त परंतु 3 मि. 30 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | 10 गुण |
| 6 मि. 30 सेकंदापेक्षा जास्त् परंतु 6 मि. 50 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | 10 गुण | 3 मि. 30 सेकंदापेक्षा जास्त परंतु 3 मि. 40 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | 06 गुण |
| 6 मि. 50 सेकंदापेक्षा जास्त् परंतु 7 मि. 10 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | 06 गुण | 3 मि. 40 सेकंदापेक्षा जास्त परंतु 3 मि. 50 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | 04 गुण |
| 7 मि. 10 सेकंदापेक्षा जास्त् परंतु 7 मि. 30 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | 02 गुण | 3 मि. 50 सेकंदापेक्षा जास्त परंतु 4 मि. 00 सेकंद किंवा त्यापेक्षा कमी | 02 गुण |
| 7 मि. 30 सेकंदापेक्षा जास्त् | 00 गुण | 4 मि. 00 सेकंदापेक्षा जास्त | 00 गुण |

# जळगांव जिल्हा होमगार्ड नोंदणी - 2024

गोळाफेक (पुरुष)

पुरुष उमेदवारास 7.260 किलोग्रॅम वजनाचा गोळा फेकावा लागेल,

गोळाफेकीसाठी खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील.

| गोळाफेकीचे अंतर मीटरमध्ये | गुण |
|---|---|
| 8.50 मीटर किंवा जास्त | 10 गुण |
| 7.90 मीटर किंवा जास्त परंतू 8.50 मीटर पेक्षा कमी | 9 गुण |
| 7.30 मीटर किंवा जास्त परंतू 7.90 मीटर पेक्षा कमी | 8 गुण |
| 6.70 मीटर किंवा जास्त परंतू 7.30 मीटर पेक्षा कमी | 7 गुण |
| 6.10 मीटर किंवा जास्त परंतू 6.70 मीटर पेक्षा कमी | 6 गुण |
| 5.50 मीटर किंवा जास्त परंतू 6.10 मीटर पेक्षा कमी | 5 गुण |
| 4.90 मीटर किंवा जास्त परंतू 5.50 मीटर पेक्षा कमी | 4 गुण |
| 4.30 मीटर किंवा जास्त परंतू 4.90 मीटर पेक्षा कमी | 3 गुण |
| 3.70 मीटर किंवा जास्त परंतू 4.30 मीटर पेक्षा कमी | 2 गुण |
| 3.10 मीटर किंवा जास्त परंतू 3.70 मीटर पेक्षा कमी | 1 गुण |
| 3.10 मीटर पेक्षा कमी | 0 गुण |

महिला उमेदवारास 4 किलो वजनाचा गोळा फेकावा लागेल,

गोळाफेकीचे अंतर (मीटरमध्ये)

| गोळाफेकीचे अंतर मीटरमध्ये | गुण |
|---|---|
| 6.00 मीटर किंवा जास्त | 10 गुण |
| 5.50 मीटर किंवा जास्त परंतू 6.00 मीटर पेक्षा कमी | 8 गुण |
| 5.00 मीटर किंवा जास्त परंतू 5.50 मीटर पेक्षा कमी | 6 गुण |
| 4.50 मीटर किंवा जास्त परंतू 5.00 मीटर पेक्षा कमी | 4 गुण |
| 4.00 मीटर किंवा जास्त परंतू 4.50 मीटर पेक्षा कमी | 2 गुण |
| 4.00 मीटर पेक्षा कमी | 0 गुण |

टीप.

(अ) जास्तीत जास्त तीन वेळा संधी देण्यांत येईल व त्यातील अधिकतम अंतर ग्राहय धरण्यात येईल.

(आ) गोळाफेकीत फेकलेला गोळा जर सीमांकन रेषेच्या मध्यावर पडला तर उमेदवारास नजीकच्या वरच्या श्रेणीतील गुण दिले जातील. (उदा. जर गोळाफेकीचे अंतर 5 मीटर असेल तर उमेदवाराला 6 गुण देण्यात येतील.)

(इ) गोळाफेक मध्ये पात्र होणेकरीता उमेदवारांना किमाण 4 गूण मिळविणे आवश्यक राहील.

# जळगांव जिल्हा होमगार्ड नोंदणी - 2024

(ई) तांत्रिक अर्हता गुण दयावयाची पध्दती

| तांत्रिक अर्हता एकूण गुण 10 | अटीची पुर्तता केल्यास | गुण |
|---|---|---|
| 1. आयटीआय प्रमाणपत्र<br>2. खेळाडूमध्ये प्राविण्य् मिळविलेल्या व्यक्ती (जिल्हास्त्रीय स्पर्धेमध्ये प्राविण्य् प्राप्त)<br>3. माजी सैनिक<br>4. एन.सी.सी. बी. प्रमाणपत्र<br>5. एन.सी.सी. सी. प्रमाणपत्र<br>6. नागरी संरक्षण सेवेत असलेले परंतु स्थानिक ठिकाणी तीन प्रशिक्षण पुर्ण केलेले प्रमाणपत्रधारक<br>7. जड वाहन चालक परवाना धारक उमेदवार | या पैकी 1 अट पूर्ण करीत असेल तर | 2 गुण |
| | या पैकी 2 अट पूर्ण करीत असेल तर | 3 गुण |
| | या पैकी 3 अटी पूर्ण करीत असतील तर | 4 गुण |
| | या पैकी 4 अटी पूर्ण करीत असतील तर | 5 गुण |
| | या पैकी 5 अटी पूर्ण करीत असतील तर | 7 गुण |
| | या पैकी 6 अटी पूर्ण करीत असतील तर | 8 गुण |
| | वरील सर्व अटी पूर्ण करीत असतील तर | 10 गुण |

*शारिरीक क्षमता चाचणी पात्र ठरल्यानंतरच तांत्रिक अर्हताचे गुण विचारात घेतले जातील.

**नोंदणी अर्ज भरणे संदर्भातील सुचना**.

1. होमगार्ड नोंदणी अर्ज दि. 25/07/2024 ते 14/08/2024 या कालावधीमध्ये https://maharashtracdhg.gov.in/mahahg/enrollmentform.php या संकेतस्थळावर फक्त इंग्रजी या भाषेमधून भरावयाचा असुन अर्ज भरतांना सर्व माहिती काळजीपुर्वक भरावयाची आहे. उदा. आधारकार्ड क्रमांक, जन्मदिनांक व्यवस्थित नोंद करावयात. एका उमेदवाराला आधारकार्ड क्रमाक च्या रहाय्याने एकदाच अर्ज दाखल करता येईल.
2. उमेदवार ज्या भागातील रहिवासी आहे तो भाग ज्या पोलीस ठाणेच्या अंतर्गत येतो त्यांना त्याच पोलीस ठाणे अंतर्गत पोलीस ठाणे आणि पथकामध्ये त्याच जिल्हयात अर्ज दाखल करता येईल. इतर जिल्हयातील अर्ज बाद ठरतील.
3. अर्ज SUBMIT केल्यावर Print Registration Form या मेनू मध्ये जावून त्याची छायांकीत प्रत काढावयाची आहे. त्यावर उमेदवारांनी भरलेल्या सर्व मजकूर छापून येईल. त्यावर आपला वर्तमानातील एक फोटो चिटकवावा. मराठी मधील नाव उमदवारानी स्व्त: पेनाने लिहावयाचे अहे. इतर कोणतीही माहिती उमेदवारांनी भरु नये.
4. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी अंतिम मुदत दि. 14/08/2024 सायं. 05:00 वाजेपर्यंत राहील. सर्व अर्जाची छाननी झालेनंतर कागदपत्र पडताळणी व शारिरीक क्षमता चाचणी करीता तारीख नंतर जाहीर करणेत येईल.
5. कागदपत्र पडताळणी व शारिरीक क्षमता चाचणी करीता येतांना अ.क्र. 1 मध्ये दर्शविल्याप्रमाणे सर्व आवश्यक कागदपत्रांच्या उमेदवारांनी स्वतः स्वाक्षरी केलेल्या छायाकिंत प्रति अर्जासोबत जोडाव्यात. अर्ज नोंदणीच्या दिवशी स्व्त: घेवून यावे. दोन फोटो व मुळ कागदपत्र नोंदणीच्या वेळी पडताळणीकरीता बंधनकारक राहील.
6. उमेदवारांना नोंदणीकरीता स्व:खर्चाने उपस्थित रहावे लागेल, नोंदणी दरम्यान किंवा प्रवासादरम्यान कोणतीही दुखापत झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.

# जळगांव जिल्हा होमगार्ड नोंदणी - 2024

7. पात्र उमदवारांची अंतिम निवड पथकानुसार रिक्त असलेल्या जागांनुसार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल. समान गुण प्राप्त् करणाऱ्या उमेदवाराच्या बाबतीत वयाने ज्येष्ठ असलेल्या उमदवारासा प्राधान्य् दिले जाईल. तसेच वय समान असेल तर शैक्षणिक अहर्ता व तांत्रिक अहर्ता प्रमाणपत्रांच्या आधारावर निवड निश्चित करणेत येईल.
8. यापुर्वी होमगार्ड संघटनेतून अकार्यक्षम/बेशिस्त् ठरल्याने न्यायालयीन प्रकरणी दोषी असल्याने सेवासमाप्त् केलेले होमगार्ड नोंदणी अर्ज करणेस अपात्र ठरतील. मात्र स्वेच्छेने राजिनामा दिलेले होमगार्ड विहीत अटी पुर्ण करीत असतील तर अर्ज करणेस पात्र राहतील.
9. पोलीस चारित्र्य पडताळणी अहवाल अनुकूल असावा.
10. शारिरीक विकलांगता असलेले उमेदवार नोंदणीसाठी अपात्र असतील.
11. बेरोजगार व्यक्ती होमगार्ड नोंदणीसाठी अपात्र असतील.
12. उमेदवार ज्या कार्यालयाच्या आस्थापनेवर कार्यरत आहे. अशा कार्यालयाने होमगार्डमध्ये नोंदणी होण्यासाठी तसेच वेळोवेळी कर्तव्य/प्रशिक्षणासाठी सवलत मंजूरीचे दिलेले लेखी संमतीपत्र.
13. अंतिम गुणवत्ता यादी याच संकेतस्थ्ळावर प्रसिद्ध केली जाईल.
14. पथक निहाय रिक्त् जागा (संख्या) कमी जास्त् करण्याचे तसेच तांत्रिक कारणास्त्व होमगार्ड सदस्य नोंदणी रद्दकरणे वा पुढील तारीख देण्याचा अधिकार मा. अध्यक्ष तथा जिल्हा समादेशक यांनी राखून ठेवले आहे.
15. अर्ज भरणेसंदर्भात काही अडचण असल्यास जिल्हा होमगार्ड कार्यालय जळगांव येथे 0257-2229717 या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

# जळगांव जिल्हा होमगार्ड नोंदणी - 2024

ऑनलाईन अर्ज खालील प्रमाणे भरावा

होमगार्ड विभागाच्या https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php या संकेत स्थळावर जावून HGs Enrollment या मेनू मधुन Online Enrollment Form हा सबमेनू निवडावा.

1. सर्व प्रथम जिल्हा Select करावा. (ज्या जिल्हयाची नोंदणी जाहीर झाली असेल तेच जिल्हे मेनू मध्ये उपलब्ध् असतील)
2. त्यानंतर आपण ज्या पोलीस ठाणेच्या हद्दीमध्ये राहता त्या विभाग ज्या होमगार्ड पथकामध्ये येतो ते पथक आणि पोलिस ठाणे Select करावे. या करीता खालील तक्ता पहावा.

| अ. क्र. | होम.पथक | अंतर्गत येणारे पो.स्टे. | अनुशेष | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | महिला | एकूण |
| 01 | जळगांव | जिल्हा पेठ, ज. शहर, ज. तालुका, MIDC, रामनानंद, शनिपेठ, नशिराबाद | 30 | 20 | 50 |
| 02 | अमळनेर | अमळनेर, मारवड | 14 | 07 | 21 |
| 03 | भडगांव | भडगांव | 03 | 04 | 07 |
| 04 | भुसावळ | भु. बाजार पेठ, भु. शहर, भु. तालुका | 29 | 10 | 39 |
| 05 | चाळीगांव | चाळीसगांव शहर, चा. तालुका, मेहुणबारे | 07 | 12 | 19 |
| 06 | चोपडा | चोपडा शहर, चो. ग्रामीण, अडावद | 07 | 11 | 18 |
| 07 | धरणगांव | धरणगांव | 09 | 08 | 17 |
| 08 | एरंडोल | एरंडोल, कासोदा | 03 | 08 | 11 |
| 09 | फैजपूर | फैजपूर | 04 | 02 | 06 |
| 10 | जामनेर | जामनेर, पहूर, फत्तेपूर | 20 | 06 | 26 |
| 11 | मुक्ताईनगर | मुक्ताईनगर | 09 | 0 | 09 |
| 12 | पाचोरा | पाचोरा, पिंपळगांव | 09 | 08 | 17 |
| 13 | पारोळा | पारोळा | 04 | 02 | 06 |
| 14 | रावेर | रावेर | 35 | 07 | 42 |
| 15 | सावदा | सावदा, निंभोरा | 02 | 02 | 04 |
| 16 | वरणगांव | वरणगांव, बोदवड | 11 | 05 | 16 |
| 17 | यावल | यावल | 17 | 0 | 17 |
| | | | 213 | 112 | 325 |

3. आपला 12 अंकी आधार क्रमांक काळजीपूर्वक भरावा. चुकीचा भरल्यास अर्ज बाद ठरविला जाईल.
4. त्यानंतर लिग, पुर्ण पत्ता, शिक्षण, व्यवसाय, इमेल आयडी, ही माहिती काळजीपूर्वक भरावी.

# जळगांव जिल्हा होमगार्ड नोंदणी - 2024

5. वरील जाहीरातीमध्ये दिल्याप्रमाणे ज्या प्राकरची तांत्रिक अर्हता आहेत त्यांची संख्या Select करावी. (उदा. उमेदवार जड वाहन चालक परवानाधारक, प्राविण्य् प्राप्त् खेळाडू आणि NCC B प्रमाणपत्र धारक असेल तर तांत्रिक अर्हता संख्या तीन/3 (Three) राहिल.
6. जन्म् दिनांक, उंची (से.मी.मध्ये) काळजीपुर्वक भरावी.
7. अर्ज SUBMIT केल्यावर आपण सरळ PRINT करण्यासाठीच्या Page वर जाल त्याठिकाणी आपला आधार क्रमांक आणि जन्म् दिनांक भरुन आपल्या अर्जाची पाहणी करुन अर्जाची PRINT A4 पेपरवर काढावी व नोंदणी करीता येताना आवश्य्क कागदपत्रांसह करावी.

   कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सर्वर कनेक्टीव्हीटी मिळत नसल्यास कार्यालयीन वेळ वगळून अर्ज भरावा.